डॉ. पंडीत शेळके
एम.एस्सी.पी.एच.डी.
प्र.कार्यक्रम समन्वयक

# पुणे विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे—४११ ००७.

कार्यालय : २५६९७३४१
: २५६०११५४
फॅक्स : २५६९७३४१
email : nss @ unipune.ac.in

संदर्भ क्र. रा.से.यो/८७३/१३

दि. १०/०९/२०१३

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक
पुणे विद्यापीठ संलग्नित
महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था

**विषय: विद्यापीठस्तरावर 'रस्ता सुरक्षा अभियान' विषयक कार्यक्रम राबविणेबाबत....**

महोदय/महोदया,

अप्पर पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी कळविल्यानुसार पुणे विद्यापीठ, व अप्पर पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यावतीने पुणे विद्यापीठ संलग्नित पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हयातील महाविद्यालये व संस्थामध्ये **दि. ०१ ऑगस्ट २०१३ ते दि. ३१ डिसेंबर २०१३** या कालावधीत नागरिकांमध्ये जनजागृती करण्याच्या उद्‌देशाने **'रस्ता सुरक्षा अभियान'** अंतर्गत कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार आपल्या महाविद्यालयामध्ये पथनाटय स्पर्धा, घोषवाक्य, प्लेकार्डस्‌द्वारे जनजागृती, निबंध स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, वादविवाद व वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात. तसेच रेल्वे स्टेशन/बसस्थानक अशा गर्दीच्या ठिकाणी पोस्टर व रॅलीद्वारे जनजागृती करण्यात यावी.

तरी वरीलप्रमाणे महाविद्यालयांच्या वतीने स्पर्धा, रॅली, पथनाटये अशाप्रकारे राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांकरीता महाराष्ट्र शासन, मुंबई यांच्या वतीने राज्यस्तरावर रोख स्वरूपात पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. त्याकरीता महाविद्यालयाने उत्कृष्ठ कार्यक्रमांचा प्रस्ताव पुणे विद्यापीठाकडे दि १० डिसेंबर २०१३ पर्यत पाठवावा ही विनंती.

सोबत : पुरस्कारासंबधीचे नियम व अटी जोडत आहे.

कळावे,

आपला विश्वासू

10/9/13

प्र.कार्यक्रम समन्वयक
राष्ट्रीय सेवा योजना
पुणे विद्यापीठ, पुणे

क्र.अपोमसं (वा) / पोअधि(मुख्या) पोनि(वा) / रसुअ—२०१४/ २३६५/२०१२.

अपर पोलीस महासंचालक (वाहतुक),
महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,
जुने जकात घर, ४ था मजला,
डि.डि. इमारत, शॉहिद भगतसिंग मार्ग,
मुंबई - ४०००२३

दिनांक :- १३/०८/२०१२

4 SEP 2013

प्रति,

मा. कुलगुरु,
...............
...............

विषय:- विद्यापिठ स्तरावर रस्ता सुरक्षा विषयक कार्यक्रम राबविण्याबाबत परिपत्रक..

"रस्ता सुरक्षा अभियान राज्यस्तरीय पुरस्कार"

(१) पुरस्काराचे स्वरुप :-

| | | | |
|---|---|---|---|
| **(I) राज्यस्तरीय पुरस्कार** | :- | अ) प्रथम पुरस्कार | रु. २,००,०००/- |
| | :- | ब) द्वितीय पुरस्कार | रु. १,००,०००/- |
| | :- | क) तृतीय पुरस्कार | रु. ७५,०००/- |
| | :- | उत्तेजनार्थ/प्रशंसापत्र ( पाच पुरस्कार) | रु. २५,०००/- |

**(II) पुरस्काराच्या अटी/नियम व गुण विभागणी :-**

१) विद्यापीठा अंतर्गत सर्वच महाविद्यालयांनी रस्ता सुरक्षा अभियानामध्ये योगदान देणे अपेक्षित आहे.

२) सर्वच विद्यार्थ्यांपर्यंत अभियानाची संकल्पना पोहचणे अपेक्षित आहे.

३) जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सहभागी करुन घेणाऱ्या विद्यापीठांना अधिकचे गुण.

**(III) गुणाचे निकष:-**

अ) प्रत्यक्ष रस्ता सुरक्षा अभियानामधील उपक्रम जास्तीतजास्त **४० गुण**
उदा. पथनाटय, घोषवाक्य / प्लेकार्डस धरुन रस्त्याच्या दुतर्फा/ गर्दीच्या ठिकाणी / रेल्वे स्टेशन/ बस स्थानक येथे जनजागृती.

ब) रस्ता सुरक्षा या विषयावर निबंध स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, वादविवाद स्पर्धा घेवून जास्तीतजास्त विद्यार्थ्यांना सहभागी करुन घेणे **३० गुण.**

क) सर्वसामान्य चालक व नागरीकांमध्ये रस्ता सुरक्षा या विषयी जनजागृतीकरीता केलेले प्रयत्न २० गुण.

इ) विद्यापीठाने आयोजित केलेल्या / महाविद्यालयाने आयोजित केलेल्या युवा महोत्सवामध्ये रस्ता सुरक्षा बाबतीत एका विषयावर स्पर्धा. जास्तीतजास्त **२० गुण.**

इ) अपघात घडल्या नंतर प्रत्यक्ष जखमींना सहाय्य किंवा प्रथोमचार याबाबत केलेली मदत. जास्तीत जास्त **२० गुण**

ई) जनसमुदाया मध्ये व्याख्यानाद्वारे प्रचार आणि प्रसार जास्तीत जास्त **२० गुण.**

उ) रोड- शो ( ह्युमन रॅली ) शोभा यात्रा, पथनाटयांचे सादरीकरण इ. जास्तीत जास्त **२० गुण.**

ऊ) विदयापीठ स्तरावरील उपक्रम जास्तीत जास्त **२० गुण.**

ए) सुबक, आकर्षक पुरस्कार प्रस्तावास जास्तीतजास्त **१० गुण.**

ऐ) कार्यशाळेचे आयोजन ( संघ नायक, कार्यक्रम अधिकारी, लोकप्रतिनिधी इ.) जास्तीत जास्त **२० गुण.**

ओ) आर. टी. ओ. कार्यालया मार्फत वाहन चालविण्याचा परवाना मिळवून देण्याबाबतची कार्यशाळा / शिबीर जास्तीत जास्त **१० गुण.**

अं) विद्यार्थी व पालक कार्यशाळेमध्ये रस्ता सुरक्षा बाबत जाणिव जागृती जास्तीत जास्त **१० गुण.**

अः) नाविण्यपूर्ण उपक्रम- **१० गुण**

ज्या विद्यापीठा मार्फत जास्तीतजास्त महाविद्यालये, जास्तीत जास्त विद्यार्थी सहभागी होतील अशा विद्यापीठांना व महाविद्यालयांना जास्तीत जास्त - **५० गुण**

**" अभियानाची सुरवात आणि प्रस्ताव सादरीकरणाची तारीख"**

१) **अभियानाची सुरुवात / कालखंड :- दिनांक १ ऑगस्ट २०१३ ते ३१ डिसेंबर २०१३**

२) **स्पर्धा महाविद्यालयीन स्तरावर असून महाविद्यालयाच्या पुरस्कारा बरोबरच त्या विद्यापीठाला मानाचा करंडक (फिरता).**

३) **निवड प्रक्रिया जिल्हा स्तरावर पहिल्या दोन महाविद्यालयांचे प्रस्ताव विद्यापीठाकडे शिफारस यासाठी निवड समिती पुढील प्रमाणे:-** समितीने १० डिसेंबर पर्यत प्रस्ताव विद्यापीठाकडे पाठविणे.

१) विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवायोजनेचे समन्वयक - अध्यक्ष
२) प्रतिथयश महाविद्यालयाचे प्राचार्य
३) प्रतिथयश सामाजिक कार्यकर्ता
४) जिल्हा पोलीस वाहतूक विभागातील प्रतिनिधी.
५) जिल्हा समन्वयक - सचिव ( रा. से. यो.)

(४) **विद्यापीठ स्तरीय समिती :-** प्रत्येक जिल्हयातून जिल्हा समितीने शिफारस केलेल्या प्रस्तावाची छानणी करुन पहिल्या दोन प्रस्तावाची राज्यस्तरीय पुरस्कारासाठी शिफारस करताना विद्यापीठाने / विद्यापीठाच्या अधिकारात पुरस्कार देऊ शकतात. विद्यापीठ समितीने हे पुरस्कार राज्य समिती / वाहतूक विभाग यांचेकडे २० डिसेंबर पर्यंत सादर करावेत. सादर करताना प्रस्तावाच्या गुणांसहित संक्षिप्त तक्ता करुन पाठवावेत.

१) मा. कुलगुरु - अध्यक्ष
२) मा. विभागीय उपसंचालक, उच्च शिक्षण.
३) मा. सामाजिक कार्यकर्ता
४) मा. कुलसचिव
५) मा. विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवायोजन चे समन्वयक - सचिव

(५) <u>राज्यस्तरीय निवड समिती</u>:-

सर्वच विद्यापीठाकडून शिफारस केलेल्या पुरस्काराची छानणी करणे व पुरस्काराची नांवे घोषित करणे.

१) मा. अपर पोलीस महासंचालक(वाहतूक) महाराष्ट्र राज्य) - अध्यक्ष.
२) मा. कुलगुरु.
३) मा. उप सचीव, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र शासन.
४) मा. राज्य संपर्क अधिकारी, रा. से. यो.
५) मा. पोलीस अधिक्षक, महामार्ग पोलीस - सचिव.

(विजय कांबळे)
अपर पोलीस महासंचालक(वा),
महाराष्ट्र राज्य, मुंबई